# पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा

**१. पदाचा तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| संवर्ग/पदाचे नांव | संवर्ग | वेतनसंरचना (Pay Matrix) | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| **पोलीस उप निरीक्षक** | अराजपत्रित गट-ब | S-१४ : ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार पोलीस निरीक्षक व त्यावरील काही पदे. | राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, अर्हता, इत्यादी बाबी परिपत्रकाद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे**:-

**२.१** प्रस्तुत परीक्षा आता खालील **तीन टप्प्यात** घेण्यात येते:-

**(एक)** पूर्व परीक्षा - १०० गुण **(दोन)** मुख्य परीक्षा - ३०० गुण **(तीन)** शारीरिक चाचणी - १०० गुण.

**२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** मुख्य परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्यासाठी आयोगाने निश्चित केलेली गुणांची किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे उमेदवार शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरतात.

**२.४** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जात नाहीत.

**३. पात्रता :-**

**३.१** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अखत्यारीतील सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई या संवर्गातील कर्मचारीच प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील.

**३.२ शैक्षणिक अर्हतेसह सेवा:-** शासन परिपत्रक/जाहिरातीमध्ये नमूद विहित दिनांकास सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई या पदावर नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून खालीलप्रमाणे किमान नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे:-

**३.२.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत - **४ वर्षे नियमित सेवा.**

**३.२.२** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची एच.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र शासनाने एच.एस.सी. च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **५ वर्षे नियमित सेवा.**

**३.२.३** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी.च्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता, अशा उमेदवारांच्या बाबतीत - **६ वर्षे नियमित सेवा.**

**३.३ वयोमर्यादा**:-

**३.३.१** अमागास उमेदवार- कमाल वयोमर्यादा-३५ वर्षे

**३.३.२** मागासवर्गीय उमेदवार- कमाल वयोमर्यादा-४० वर्षे

**३.३.३** शासन परिपत्रकात नमूद केलेल्या दिनांकास वयाची गणना केली जाईल.

**३.३.४** पोलीस उप निरीक्षक, (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २००८ नुसार एखाद्या वर्षी परीक्षा न झाल्यामुळे कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी परीक्षेच्या सलग तीन संधी मिळाल्या नसतील अशा उमेदवारांना कमाल वयोमर्यादेनंतर सलग होणा-या परीक्षेस बसण्याच्या उर्वरित संधी देण्यात येतील. तथापि, कोणत्याही परिस्थितीत या सलग संधी तीन पेक्षा जास्त असणार नाहीत.

**३.३.५** सेवाप्रवेश नियमातील कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी अर्ज करणा-या उमेदवारांना परीक्षेच्या कमाल संधी बाबत कोणतीही मर्यादा लागू नाही.

**३.३.६** इतर कोणत्याही बाबतीत वयोमर्यादा शिथिल केली जाणार नाही.

**४. निवडप्रकिया** :-

**४.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत/शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**४.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया पोलीस उप निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सेवाप्रवेश नियम १९९५ सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल.

**५. शुल्क (फी):-**

**५.१** प्रस्तुत परीक्षेकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | ५४४ | ३४४ |
| (२) | मुख्य परीक्षा | ८४४ | ५४४ |

**५.२** वि.जा. (अ), भ.ज. (ब), वि.मा.प्र., भ.ज. (क), भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व **प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या** उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**६. परीक्षा योजना:-**

**६.१ पूर्व परीक्षा :-**

**६.१.१ परीक्षेचे टप्पे - एक.** लेखी परीक्षा

**६.१.२ एकूण गुण - १००.**

**६.१.३ प्रश्नपत्रिका :- एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| विषय (संकेतांक क्र. ०१४) | माध्यम | प्रश्नसंख्या व गुण | दर्जा | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | मराठी | २५ | शालांत | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| इंग्रजी | इंग्रजी | २५ | | | |
| सामान्य अध्ययन | इंग्रजी व मराठी | ५० | | | |

**६.१.४ अभ्यासक्रम :-**

प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ' **उमेदवारांना सूचना** ' अंतर्गत " **अभ्यासक्रम** " या सदराखाली उपलब्ध आहे.

**६.१.५ परीक्षा केंद्र:-**

(१) पूर्व परीक्षा खालील सात जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| नांदेड | **३३** |
| अमरावती | **१४** |
| नाशिक | **३५** |

(२) परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(३) परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) विहित पद्धतीने अर्ज/माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले जिल्हा केंद्र व उपलब्धतेनुसार संबंधित जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(६) एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या केंद्र अथवा परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(७) वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्या आधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या-त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.१.६ पूर्व परीक्षेचा निकाल :-**

(१) पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरवावयाच्या उमेदवारांचे प्रमाण हे आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रचलित तरतुदी नुसार असेल.

(२) आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

(३) मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(४) मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशद्वारे (एस.एम.एस.) वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

(५) पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.२ मुख्य परीक्षा :-**

**६.२.१ परीक्षेचे टप्पे :- दोन. (१)**लेखी परीक्षा - ३०० गुण **(२)** शारीरिक चाचणी - १०० गुण

**६.२.२ परीक्षेस प्रवेश :-**

(१) पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे उमेदवारास मुख्य लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

(२) मुख्य परीक्षेकरीता शासनाकडून परिपत्रक प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार परीक्षा केंद्र निवडून परीक्षा शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

(३) पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना आयोगाकडे सादर केलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

**६.२.३ परीक्षा योजना :-**

**(१) एकूण गुण - ३००.**

**(२) प्रश्नपत्रिका :- एक**. प्रश्नपत्रिकेचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| संकेतांक क्रमांक | विषय | माध्यम | प्रश्नसंख्या व गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| २०१ | विधी (प्रमुख कायदे व इतर कायदे) | इंग्रजी व मराठी | १५०/३०० | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**(३) अभ्यासक्रम :-** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘ **उमेदवारांना सूचना** ’ अंतर्गत “ **अभ्यासक्रम** ” या सदराखाली उपलब्ध आहे.

(४) प्रस्तुत परीक्षेकरीता प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी कोणत्याही प्रकारची पुस्तके, संदर्भ ग्रंथ, टिप्पण्या इत्यादींचा वापर करता येणार नाही.

**६.२.४ परीक्षा केंद्र :-**

(१) खालील सहा ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेता येवू शकेल :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक | केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|---|---|
| अमरावती | **१४** | नागपूर | **३२** |
| औरंगाबाद | **१५** | नाशिक | **३५** |
| मुंबई | **३०** | पुणे | **३८** |

(३) परीक्षा वर नमूद केल्याप्रमाणे सहा ठिकाणी घ्यावयाचा निर्णय झाल्यास उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(४) उपरोक्त परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

(५) उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेकरिता अर्ज/माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(६) परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(७) विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(८) एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(९) एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(१०) वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.२.५ मुख्य परीक्षेचा निकाल :-**

(१) प्रस्तुत परीक्षेमधुन भरावयाच्या एकूण पदांपैकी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील,अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

(२) आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, शारीरिक चाचणीसाठी पात्र समजण्यात येईल.

(३) प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या **किमान ३५ शतमत** गुण प्राप्त करणारे उमेदवार, शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील :-

(४) निकाल जाहीर झाल्याची बातमी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलद्वारे आणि मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशद्वारे (एस.एम.एस.द्वारे) वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**६.३. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**६.३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**६.३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**७. शारीरिक चाचणी :-**

**७.१** लेखी परीक्षेत आयोगाने निश्चित केलेल्या सीमांकन रेषेएवढे किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

**७.२** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित दिनांकास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**७.३** शारीरिक चाचणीचा तपशील :-

| **पुरुषांसाठी** | | **महिलांसाठी** | |
|---|---|---|---|
| १ | गोळाफेक-वजन- ७.२६० कि.ग्रॅ.- कमाल गुण - १५ | १ | गोळाफेक - वजन - ४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| २ | पुल अप्स - कमाल गुण - २० | २ | धावणे ( २०० मीटर्स ) कमाल गुण - ४० |
| ३ | लांब उडी - कमाल गुण - १५ | ३ | चालणे (३ कि.मी.) कमाल गुण - ४० |
| ४ | धावणे ( ८०० मीटर्स ) - कमाल गुण - ५० | | |
| | **एकूण गुण - १००** | | **एकूण गुण - १००** |

**७.४ प्रस्तुत परीक्षेमध्ये अंतिम निवडीकरीता विचारक्षेत्रात येण्यासाठी** शारीरिक चाचणीमध्ये किमान ४५% गुण मिळविणे आवश्यक आहे.

**७.५** शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेऊन शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

**७.६** शारीरिक चाचणीच्या सरावासाठी उमेदवार राज्यातील पोलीस कवायत मैदानांचा उपयोग करू शकतील आणि पोलीस मुख्यालयातील पोलीस उपायुक्तांच्या, तसेच पोलीस अधिक्षकांच्या परवानगीने निर्देशकांची मदत घेऊ शकतील.

**७.७ प्रमाणपत्र पडताळणी :-**

(१) शारीरिक चाचणीमध्ये ४५ % गुण मिळविणा-या उमेदवारांनाच प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल.

(२) प्रमाणपत्र पडताळणीस पात्र ठरणा-या उमेदवारांची पात्रता, जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ प्रमाणपत्रांच्या/ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

(३) अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

(४) विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(५) वरीलप्रमाणे मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे तसेच शारीरिक चाचणीच्या आधारे पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येईल.

**८. अंतिम निकाल :-**

**८.१** शारीरिक चाचणीचे गुण अनिवार्य ठेवण्यात आले असून अंतिम निकाल तयार करताना या गुणांचा विचार करण्यात येईल.

**८.२** मुख्य लेखी परीक्षा आणि शारीरिक चाचणीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

**८.२** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**९. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**९.१** पदाच्या/संवर्गाच्या अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**९.२** सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे " भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) " हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**९.३** " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " पर्याय सादर करण्यासाठी उमेदवारांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**९.४** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**९.५** पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**१०. शिफारस :-**

**१०.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**१०.२** शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१०.३** शिफारसीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**११. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

**११.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) गुणांची किमान सीमांकन रेषा.

**११.२** वरील तपशील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिल्यानंतर याबाबतची माहिती उमेदवारांना संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१२.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक : ०६ जानेवारी, २०२२

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग